marico
make a difference

August 29, 2025

The Secretary,
Listing Department,
BSE Limited,
1st Floor, Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street, Mumbai – 400001
Scrip Code: 531642

The Manager,
Listing Department,
The National Stock Exchange of India Limited,
'Exchange Plaza', C-1 Block G,
Bandra Kurla Complex, Bandra (East),
Mumbai – 400051
Scrip Symbol: MARICO

Dear Sir/Madam,

Sub.: Newspaper advertisement regarding Special Window for re-lodgement of transfer request of physical shares

Pursuant to Regulation 30 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, please find enclosed copies of newspaper advertisement published in Business Standard (English) and Navshakti (Marathi) editions today i.e., August 29, 2025, regarding special window for re-lodgement of transfer requests of physical shares, in line with the SEBI circular dated July 2, 2025.

The Company has also hosted a notice in this regard on its website at: https://marico.com/india/investors/investor-relations-grievances

Kindly take the above on record.

Thank you.

Yours faithfully,
For **Marico Limited**

VINAY M A Digitally signed by VINAY M A Date: 2025.08.29 20:33:18 +05'30'

Vinay M A
Company Secretary & Compliance Officer

Encl.: As above

Marico Limited
Regd Office:
7th Floor
Grande Palladium
175, CST Road, Kalina
Santacruz (E)
Mumbai 400 098, India
Tel: (91-22) 6648 0480
Fax: (91-22) 2650 0159
www.marico.com

CIN: L15140MH1988PLC049208
Email: investor@marico.com

हेम होल्डिंग्ज अ‍ॅण्ड ट्रेडिंग लिमिटेड

सीआयएन: एल६५९९०एमएच१९८२पीएलसी०२६८२३
नोंदणी. कार्यालय: युनिट नं. व्ही-३४८, दी सेंट्रीयम, ३ रा मजला, कुर्ला किरोळ, एलबीएस, कुर्ला, मुंबई, महाराष्ट्र, भारत-४०००७०, । **इमेल:** compliance@hemholdings.com

४३ व्या वार्षिक सभेची सूचना, बुक क्लोजर आणि ई-मतदानाची माहिती

१. याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, हेम होल्डिंग्ज अ‍ॅण्ड ट्रेडिंग लिमिटेड (कंपनी)ची ४३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) एजीएम बोलविणारे सूचनेमध्ये मांडलेल्या कामकाज पार पाडण्यासाठी कंपनी अधिनियम, २०१३ आणि त्या अंतर्गत बनविलेले नियमांचे लागू असलेले तरतुदींनुसार आणि सिक्युरिटीज् अ‍ॅण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अ‍ॅण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ सहवाचता निगम व्यवहार मंत्रालय द्वारे जारी केलेल्या दिनांक ८ एप्रिल, २०२०, १३ एप्रिल, २०२०, ५ मे, २०२०, १३ जानेवारी, २०२१, २८ डिसेंबर, २०२२ आणि २५ सप्टेंबर, २०२३ रोजीचा सर्वसामान्य परिपत्रके (एकत्रितरित्या ''एमसीए सर्क्युलर्स'' असा संदर्भित) आणि सिक्युरिटीज् अ‍ॅण्ड एक्सचेंज् बोर्ड ऑफ इंडिया (''सेबी'') परिपत्रक दिनांकित १२ मे, २०२० आणि १५ जानेवारी, २०२१ आणि निगम व्यवहार मंत्रालय (''एमसीए'') आणि सेबी द्वारे जारी केलेल्या इतर लागू असलेले परिपत्रके (एकत्रितरित्या ''लागू असलेले परिपत्रके'' असा संदर्भित) ला अनुसरुन शनिवार, २७ सप्टेंबर, २०२५ रोजी दु. २.०० वा. व्हिडिओ कॉन्फरेंसिंग (''व्हीसी'')/अदर ऑडिओ व्हिज्युअल मिन्स (''ओएव्हीएम'') मार्फत घेतले जाईल. सदस्यांना व्हीसी/ओएव्हीएम मार्फत एजीएम मध्ये सामील आणि मतदान करू शकेल. फक्त व्हीसी/ओएव्हीएम सुविधे मार्फत सामील होणारे सभासदांना एजीएम मध्ये हजेरी असल्याचे गृहीत धरले जाईल आणि त्यांचे हजेरी गणपूर्तीच्या हेतुसाठी गणले जाईल.

२. लागू असलेले परिपत्रिकला अनुसरुन एजीएम बोलविणारे सूचना आणि वित्तीय वर्ष २०२४-२५ करिता वित्तीय विवरण सह मंडळाच्या अहवाल, लेखापरीक्षकांचे अहवाल आणि त्या संबंधी जोडण्यासाठी आवश्यक इतर दस्तावेज ज्यांचे इमेल पत्ते कंपनी/डिपॉझिटरी पार्टीसिपंट सह नोंदणीकृत आहे असा सर्व कंपनीचे सभासदांना पाठवण्यात आले आहेत. उक्तनिर्देशित कागदपत्रे कंपनीच्या वेबसाइटवर म्हणजे www.hemholdings.com, शेअर बाजारांच्या वेबसाइटवर म्हणजे बीएसई लिमिटेडच्या www.bseindia.com येथे आणि सीडीएसएल (दुरस्थ ई-मतदान सुविधा आणि एजीएम दरम्यान ई-मतदान प्रणाली पुरविणारे एजेंसी) च्या वेबसाइटवर म्हणजे www.evotingindia.com येथेही उपलब्ध असतील.

पुढे, लिस्टींग रेग्युलेशन्सच्या रेग्युलेशन ३६(१) (बी) नुसार, ज्यांनी त्यांचे ई-मेल आयडीज नोंदवले नसतील त्या सभासदांना जेथे एजीएमची सूचना आणि वार्षिक अहवाल २०२४-२५ पाहता येईल अशा कंपनीच्या वेबसाईटच्या नेमक्या मार्गासह वेबलिंक असलेले एक प्रत्यक्ष पत्र पाठवले जात आहे.

३. दूरस्थ ई-मतदान आणि एजीएमदरम्यान ई-मतदानासाठी सूचना:

ए. कंपनी आपल्या सदस्यांना एजीएममध्ये पारित होणे प्रस्तावित असलेल्या ठरावांवर इलेक्ट्रॉनिक माध्यमातून (''ई-मतदान'') द्वारे मतदानाची सुविधा देत आहे. सदस्य खाली नमूद केलेल्या कालावधीत सीडीएसएलच्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रणेचा वापर करून दूरस्थ पद्धतीने (''दूरस्थ ई-मतदान'') मतदान करू शकतात.

बी. याशिवाय, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रणेद्वारे मतदानाची सुविधा एजीएममध्ये दिली जाईल आणि ज्या सदस्यांनी दूरस्थ ई-मतदानाद्वारे मतदान केलेले नाही त्यांना ई-मतदानाच्या माध्यमातून एजीएममध्ये मतदान करता येईल.

सी. ज्या सदस्यांनी आपले मतदान दूरस्थ ई-मतदानाद्वारे केलेले आहे त्यांना एजीएममध्ये उपस्थित राहता येईल परंतु एजीएममध्ये त्यांना पुन्हा मतदान करता येणार नाही.

डी. कंपनीने सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल) या एजन्सीच्या सेवा (''दूरस्थ ई-मतदान'') तसेच ४३ व्या एजीएममध्ये व्हीसी/ ओएव्हीएम सुविधेचा वापर करून आणि ४२व्या एजीएममध्ये ई-मतदान करण्यासाठी सुविधा देण्यासाठी नियुक्त केल्या आहेत.

ई. दूरस्थ ई-मतदान सुविधा पुढील नमूद कालावधीत उपलब्ध असेल: दूरस्थ ई-मतदान सुरू होण्याची तारीख आणि वेळ: २४ सप्टेंबर, २०२५ स. ९.०० वा. आणि दूरस्थ ई-मतदान संपण्याची तारीख आणि वेळ: २६ सप्टेंबर, २०२५ सायं ५.०० वा.

एफ. त्यानंतर सीडीएसएलकडून दूरस्थ ई-मतदानाची यंत्रणा अकार्यान्वित केली जाईल. भागधारकाने एखाद्या ठरावावर मतदान केल्यावर भागधारकाला त्यानंतर ते बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही. कंपनीच्या ज्या समभागधारकांनी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरूपात समभाग कट-ऑफ तारखेला म्हणजे १९ सप्टेंबर, २०२५ रोजी घेतलेले आहेत त्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करता येईल.

जी. कोणतीही व्यक्ती जिला कंपनीच्या समभाग संपादित केल्या असल्यास आणि ती कंपनीने ४३ व्या एजीएमची सूचना इमेलद्वारे पाठवल्यानंतर कंपनीची सदस्य झाल्या आणि कट-ऑफ तारखेला म्हणजे शुक्रवार, १९ सप्टेंबर २०२५ रोजी कंपनीची सदस्य होते तिला helpdesk.evoting@cdslindia.com येथे विनंती पाठवून युजर आयडी आणि पासवर्ड मिळवता येईल. तथापि, जर कोणत्याही व्यक्ती सीडीएसएल कडे ई-मतदानासाठी आधिच नोंदणीकृत असल्यास त्यांनी मतदानासाठी सध्याचे युजर आयडी आणि पासवर्ड वापरू शकतात.

एच. कंपनीच्या संचालक मंडळाने मीना नायडू अ‍ॅण्ड असोसिएटस् चे सीएस मीना नायडू, कार्यरत कंपनी सचिव (सीपी क्र. २३८५३ आणि सदस्यत्व क्र. ए २८१९३) यांची नेमणूक पडताळणी अधिकारी म्हणून केली असून ते स्पष्ट आणि पारदर्शक पद्धतीने ई-मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी पडताळणी करतील.

आय. ज्या सभासदांना एजीएम दरम्यान किंवा पूर्वी मदत हवी असल्यास त्यांनी helpdesk.evoting@cdslindia.com येथे एक ई-मेल पाठवू शकता किंवा टोल फ्री क्र. १८०० २२ ५५ ३३ येथे सीडीएसएलशी संपर्क साधावा.

जे. इलेक्ट्रॉनिक माध्यमाने मतदानाचे सुविधा संबंधित सर्व तक्रार श्री. राकेश दळवी, वरिष्ठ व्यवस्थापक (सीडीएसएल), सेन्ट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड, ए विंग, २५वा मजला, मॅरेथॉन फ्युच्युरेक्स, मफतलाल मिल कंपाऊंडस, एन एम जोशी मार्ग, लोअर परेल (पूर्व), मुंबई-४०० ०१३ यांच्या कडे पाठवावे, किंवा helpdesk.evoting@cdslindia.com येथे ईमेल पाठवू शकतात किंवा टोल फ्री क्र. १८०० २२ ५५ ३३ वर कॉल करू शकतात.

हेम होल्डिंग्ज अ‍ॅण्ड ट्रेडिंग लिमिटेडसाठी
सही/-
संगीता के. शाह
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन क्र.:०५३२२०३९

दिनांक : २८.०८.२०२५
ठिकाण: मुंबई

विंडसर मशीनस् लिमिटेड

WINDSOR Partner in Progress

(सीआयएन: एल९९९९९एमएच१९६३पीएलसी०१२६४२)
नोंदणीकृत कार्यालय: १०२/१०३, देवमिलन को. ऑप. हौसिंग सोसायटी, टिप टॉप प्लाझा जवळ, एल. बी. एस. रोड, ठाणे (प.) - ४०० ६०४, महाराष्ट्र
कॉर्पोरेट कार्यालय : प्लॉट क्र. ५४०२-५४०३, फेज IV, जीआयडीसी वटवा, अहमदाबाद-३८२४४५, गुजरात
दूरध्वनी: +९१ २२ २५८३ ६५९२, फॅक्स: +९१ २२ २५८३ ६२८५
संकेतस्थळ: www.windsormachines.com, ई-मेल: cs@windsormachines.com

६२ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि ई-मतदान माहिती

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की:

१. कंपनीची ६२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) शनिवार, २० सप्टेंबर २०२५ रोजी स. ११:०० वा. भाप्रवे व्हीसी/ओएव्हीएम द्वारे आयोजित केली जाईल जेणेकरून सदस्यांना त्यांच्या नोंदणीकृत ईमेल आयडीवर पाठवलेल्या ६२व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत नमूद केल्याप्रमाणे व्यवसाय करता येतील.

२. ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या उद्देशाने कंपनीचे सदस्य नोंदणी आणि शेअर हस्तांतरण पुस्तके रविवार, १४ सप्टेंबर २०२५ ते शनिवार, २० सप्टेंबर २०२५ (दोन्ही दिवस समाविष्ट) बंद राहतील.

३. ६२व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेची इलेक्ट्रॉनिक प्रत आणि आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी कंपनीच्या वार्षिक अहवालाची इलेक्ट्रॉनिक प्रत, ज्यामध्ये ई-व्होटिंगची प्रक्रिया आणि पद्धत दर्शविली आहे, त्या सर्व सदस्यांना गुरुवार, २८ ऑगस्ट २०२५ रोजी पाठवण्यात आली आहे ज्यांचे मेल आयडी कंपनी/डिपॉझिटरी सहभागींकडे नोंदणीकृत आहेत. वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि वार्षिक अहवाल मिळविण्यासाठी वेब लिंक/मार्ग असलेले पत्र ज्या भागधारकांनी त्यांचे ईमेल आयडी नोंदणीकृत केलेले नाहीत त्यांना पाठवले जाईल.

४. कंपनीच्या ६२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची (एजीएम) सूचना, २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या वार्षिक अहवालासह, कंपनीच्या www.windsormachines.com या वेबसाइटवरून तसेच स्टॉक एक्सचेंजेसच्या वेबसाइटवरून, म्हणजेच बीएसई लिमिटेडच्या www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या www.nseindia.com या वेबसाइटवरून डाउनलोड करता येईल. याव्यतिरिक्त, ही माहिती ई-मतदान सुविधा प्रदान करणारी एजन्सी सीडीएसएलच्या वेबसाइटवर www.evotingindia.com या वेबसाइटवर उपलब्ध आहे.

५. कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १०८ आणि इतर लागू असलेल्या तरतुदी, जर असतील तर, सुधारित कंपन्या (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम २० सह वाचल्या जातात आणि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या नियम ४४ नुसार, कंपनी तिच्या भागधारकांना ६२व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे व्यवसायांवर मतदानाचा अधिकार इलेक्ट्रॉनिक पद्धतीने वापरण्याची सुविधा प्रदान करण्यास आनंदित आहे. कंपनीने इलेक्ट्रॉनिक मतदान सुविधा प्रदान करण्यासाठी एजन्सी म्हणून सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड (सीडीएसएल) ची नियुक्ती केली आहे. ई-मतदान कालावधी बुधवार, १७ सप्टेंबर २०२५ रोजी स. ९:०० वा. भाप्रवे सुरू होईल आणि शुक्रवार, १९ सप्टेंबर २०२५ रोजी संध्या. ० ५:०० वा. भाप्रवे संपेल. त्यानंतर ई-व्होटिंगसाठी सीडीएसएल रिमोट ई-व्होटिंग मॉड्यूल बंद करेल.

६. मतदान करण्यास पात्र असलेल्या सदस्यांची नावे मोजण्यासाठी अंतिम तारीख शनिवार, १३ सप्टेंबर, २०२५ आहे. फक्त अंतिम तारखेला असलेला सदस्यच वार्षिक सर्वसाधारण सभेत ई-व्होटिंग सुविधा किंवा मतदानाचा अधिकार राखू शकेल.

७. वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना पाठवल्यानंतर कंपनीचे शेअर्स खरेदी करणारा आणि कंपनीचा सदस्य बनणारा आणि अंतिम तारखेला म्हणजेच शनिवार, १३ सप्टेंबर २०२५ रोजी शेअर्स धारण करणारा कोणताही व्यक्ती मतदानाचा अधिकार राखेल. रिमोट ई-व्होटिंगसाठी सीडीएसएलमध्ये आधीच नोंदणीकृत असलेले सदस्य मतदान करण्यासाठी त्यांचा विद्यमान पासवर्ड वापरू शकतात. जर एखादा सदस्य त्याचा लॉगिन-पासवर्ड विसरला असेल तर तो www.evotingindia.com या वेबसाइटला भेट देऊ शकतो, त्यानंतर शेअरहोल्डर्सवर क्लिक करू शकतो, युजर आयडी आणि इमेज व्हेरिफिकेशन कोड टाकू शकतो आणि फॉरगेट पासवर्डवर क्लिक करू शकतो आणि सिस्टमने सांगितल्याप्रमाणे तपशील प्रविष्ट करू शकतो. पहिल्यांदाच वापरकर्ता आयकर विभागाने जारी केलेला त्याचा १०-अंकी अल्फा-न्यूमेरिक पॅन प्रविष्ट करू शकतो. त्याच्या/तिच्या डिमॅट खात्यात नोंदवलेली जन्मतारीख आणि लाभांश बँक तपशील. हे तपशील योग्यरित्या प्रविष्ट केल्यानंतर, सदस्य ''सबमिट'' टॅबवर क्लिक करू शकतो.

८. हे लक्षात घ्यावे की: -
अ) वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत नमूद केलेले कामकाज इलेक्ट्रॉनिक पद्धतीने करता येईल.
ब) ई-व्होटिंगद्वारे मतदानाचा अधिकार वापरल्यानंतरही सदस्य एजीएममध्ये सहभागी होऊ शकतो परंतु पुन्हा मतदान करण्याचा अधिकार राहणार नाही.
क) ज्या सदस्यांनी रिमोट ई-व्होटिंगचा लाभ घेतला नाही ते ई-व्होटिंगद्वारे बैठकीत मतदान करतील.

९. मतदान प्रक्रिया निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी कंपनीने कंपनी सेक्रेटरी इन प्रॅक्टिस, श्रीम. रमा सुब्रमण्यम यांची छाननीकार म्हणून नियुक्ती केली आहे.

१०. जर तुम्हाला सीडीएसएल ई-व्होटिंग सिस्टीम वरून एजीएम आणि ई-व्होटिंगमध्ये सहभागी होण्याबाबत काही प्रश्न किंवा समस्या असतील, तर तुम्ही helpdesk.evoting@cdslindia.com वर ईमेल लिहू शकता किंवा टोल फ्री क्रमांक १८०० २१०९९११ वर संपर्क साधू शकता. इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्याच्या सुविधेशी संबंधित सर्व तक्रारी श्री. राकेश दळवी, वरिष्ठ व्यवस्थापक, (सीडीएसएल) सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड, ए विंग, २५ वा मजला, मॅरेथॉन फ्युचरेक्स, मफतलाल मिल कंपाउंड्स, एन एम जोशी मार्ग, लोअर परळ (पूर्व), मुंबई - ४०००१३ यांना पाठवू शकता किंवा helpdesk.evoting@cdslindia.com वर ईमेल पाठवू शकता किंवा टोल फ्री क्रमांक १८०० २१०९९११ वर कॉल करू शकता.

विंडसर मशीनस् लिमिटेडकरिता
सही/-
रोहित सोजित्रा
कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी

ठिकाण : राजकोट
दिनांक : २८ ऑगस्ट, २०२५

marico

मॅरिको लिमिटेड

सीआयएन : L15140MH1988PLC049208
नोंदणीकृत कार्यालय : ७ वा मजला, ग्रॅन्ड पलाडियम, १७५, सीएसटी रोड, कालिना, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - ४०० ०९८.
दूरध्वनी क्र. : +९१-०२२-६६४८ ०४८०; **फॅक्स क्र. :** +९१-०२२-२६५० ०१५९
वेबसाइट : www.marico.com; **ई-मेल :** investor@marico.com

भौतिक शेअर्सच्या हस्तांतरण विनंत्यांच्या पुनः सादरीकरणासाठी विशेष खिडकी

भारतीय सिक्युरिटीज आणि एक्सचेंज बोर्डाच्या परिपत्रक क्र. SEBI/HO/MIRSD/MIRSDPoD/P/CIR/2025/97, जुलै ०२, २०२५ ला अनुसरून भागधारकांना याद्वारे सूचित करण्यात येत आहे की, मॅरिको लिमिटेड (''**कंपनी**'') च्या भौतिक शेअर्सची हस्तांतरण विनंती पुन्हा दाखल करता येण्याकरिता जुलै ०७, २०२५ ते जानेवारी ०६, २०२६ या सहा महिन्यांच्या कालावधीकरिता कंपनीने विशेष खिडकी खुली केली आहे. एप्रिल ०१, २०१९ पूर्वी दाखल करण्यात आलेल्या आणि दस्तावेज/प्रक्रिया वा अन्य कारणास्तव रद्द झालेल्या/परत आलेल्या/दखल न घेतल्या गेलेल्या हस्तांतरण दस्तावेज पुन्हा दाखल करण्याकरिता सदर सुविधा उपलब्ध आहे. सदर विशेष खिडकी कालावधीदरम्यान हस्तांतरणाकरिता पुनः सादर केलेले शेअर्स हे केवळ डीमॅट स्वरूपात वितरीत करण्यात येतील व हस्तांतरण तथा डीमॅटकरिता ची प्रक्रिया पालन करण्यात यावी.

ज्या भागधारकांची हस्तांतरण करार सादर करणे/पुन्हा सादर करण्याकरिताची संधी हुकली असेल त्यांनी कंपनी/रजिस्ट्रार व शेअर ट्रान्स्फर एजंट - एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (आरटीए) यांना त्यांच्या वेबसाइटवर https://web.in.mpms.mufg.com/helpdesk/Service_Request.html या लिंकचा वापर करून किंवा कंपनीला investor@marico.com येथे ई-मेल पाठवून आवश्यक दस्तावेज सादर करून सदर संधीचा लाभ घ्यावा.

पात्र भागधारकांनी कृपया सर्व दृष्टीने भरलेल्या त्यांच्या हस्तांतरण विनंती जानेवारी ०६, २०२६ रोजी वा तत्पूर्वीपर्यंत सदर विशेष खिडकीच्या माध्यमातून सादर कराव्यात. जानेवारी ०६, २०२६ पश्चात सदर विशेष खिडकीच्या माध्यमातून सादर केलेली कोणतीही विनंती कंपनी/आरटीए यांच्याद्वारे स्वीकारण्यात येणार नाही.

यासंदर्भातील पत्रव्यवहार कंपनीची वेबसाइट https://marico.com/india/investors/investor-relations-grievances वरही उपलब्ध आहे.

मॅरिको लिमिटेड करिता
सही/-
विनय एम ए
कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी

ठिकाण : मुंबई
दिनांक : ऑगस्ट २९, २०२५

स्पेंटा इंटरनॅशनल लिमिटेड

सीआयएन - एल२८१२९एमएच१९१पीएलसी०४०४८२
नोंदणीकृत कार्यालय: प्लॉट क्र. १३ ते १६, दिवाण इंडस्ट्रियल इस्टेट, गावे नावली, पालघर (प) - ४०१ ४०४.
दूरध्वनी - ७६६६६२५३६८ / ७६६६०२५३८८१ **ई-मेल:** cs@spentasocks.com **संकेतस्थळ:** www.spentasocks.com

३८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, ई-व्होटिंग व वह्या बंद करण्याबाबतची जाहीर सूचना

१. येथे सर्वांना सूचित करण्यात येते की, ३८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) गुरुवार, दि. १८ सप्टेंबर, २०२५ रोजी दुपारी १२.०० वा. व्हिडिओ कॉन्फरन्सिंग (व्हीसी)/इतर ऑडिओ व्हिज्युअल माध्यमांद्वारे (ओएव्हीएम) घेण्यात येणार असून, संबंधित सभेच्या अधिसूचनेत व त्यासोबतच्या स्पष्टीकरणात्मक निवेदनात नमूद केल्याप्रमाणे विषयांवर चर्चा व निर्णय घेण्यात येईल, हे कंपनी कायदा, २०१३ मधील लागू तरतुदींनुसार असेल. कॉर्पोरेट कार्य मंत्रालयाने ('एमसीए') ५ मे, २०२०, १३ जानेवारी, २०२१, ८ डिसेंबर, २०२१, १४ डिसेंबर, २०२१, ५ मे, २०२२ व २८ डिसेंबर, २०२२ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकांसह ८ एप्रिल, २०२०, १३ एप्रिल, २०२० व २८ डिसेंबर, २०२२ रोजी निर्गमित परिपत्रके (एकत्रितपणे ''एमसीए परिपत्रके'') तसेच सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (''सेबी'') यांनी १२ मे, २०२०, १५ जानेवारी, २०२१, १३ मे, २०२२ व ५ जानेवारी, २०२३ रोजी निर्गमित परिपत्रके (एकत्रितपणे ''सेबी परिपत्रके'') यांच्या अधीन राहून सभा घेण्यात येणार आहे. सदस्यांना ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमातून सभेला उपस्थित राहता येईल, परंतु प्रतिनिधी नेमण्याची सुविधा उपलब्ध राहणार नाही. ऑडिओ-व्हिज्युअल माध्यमातून सभेला उपस्थित राहणारे सदस्य कंपनी कायदा, २०१३ मधील कलम १०३ नुसार कोरम ठरवण्यासाठी मोजले जातील.

२. ३८ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची अधिसूचना व ३१ मार्च, २०२५ रोजी समाप्त झालेल्या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल यांची इलेक्ट्रॉनिक प्रत कंपनी/डिपॉझिटरी सहभागी यांच्याकडे नोंदणीकृत ई-मेल पत्ते असलेल्या सर्व सदस्यांना पाठविण्यात आलेली आहे. सदर अधिसूचना व वार्षिक अहवाल कंपनीच्या संकेतस्थळावर **www.spentasocks.com** तसेच शेअर बाजाराच्या संकेतस्थळावर **www.bseindia.com** येथे उपलब्ध आहेत. सदस्यांनी याची नोंद घ्यावी की कंपनीतर्फे वरील दस्तऐवजांच्या भौतिक प्रती उपलब्ध करून देण्यात येणार नाहीत. ३८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची अधिसूचना मंगळवार, दि. २६ ऑगस्ट, २०२५ रोजी पाठविण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

३. ज्यांच्या नावावर शुक्रवार, दि. १२ सप्टेंबर, २०२५ रोजी शेअर्स नोंद आहेत, असे सदस्य, ते शेअर्स भौतिक स्वरूपात असोत किंवा डीमॅट स्वरूपात, अधिसूचनेत नमूद करण्यात आलेल्या सामान्य व विशेष विषयांवरील ठरावांवर मतदान करू शकतील. हे मतदान एमयूएफजी इनटाईम इंडिया प्रा. लि. द्वारे उपलब्ध करून दिलेल्या इंस्टा व्होट या इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीमार्फत (''रिमोट ई-व्होटिंग'') करता येईल. यासंबंधी सर्व सदस्यांना खालीलप्रमाणे सूचित करण्यात येते:
१. अधिसूचनेतील सामान्य ठराव व विशेष ठराव इलेक्ट्रॉनिक मतदानाद्वारे पारित केले जातील.
२. रिमोट ई-व्होटिंग सोमवार, दि. १५ सप्टेंबर, २०२५ रोजी सकाळी ०९.०० वा. (भा.प्र.वे.) सुरू होईल.
३. रिमोट ई-व्होटिंग बुधवार, दि. १७ सप्टेंबर, २०२५ रोजी सायं. ०५.०० वा. (भा.प्र.वे.) समाप्त होईल.
४. रिमोट ई-व्होटिंग किंवा सभेत मतदान करण्यासाठी पात्रता निश्चित करण्यासाठी कट-ऑफ दिनांक शुक्रवार, दि. १२ सप्टेंबर, २०२५ आहे.
५. अधिसूचना पाठविल्यानंतर कंपनीचे शेअर्स खरेदी करणारी व कंपनीची सदस्य होणारी व्यक्ती जर कट-ऑफ दिनांक (१२ सप्टेंबर, २०२५) रोजी शेअर्स धारक असेल, तर ती व्यक्ती अधिसूचनेत दिलेल्या प्रक्रियेनुसार लॉग-इन आयडी व पासवर्ड निर्माण करू शकते.
६. सदस्यांनी हे नोंद घ्यावे की:-
(अ) वर नमूद केलेल्या दिनांक व वेळेनंतर एमयूएफजी इनटाईम इंडिया प्रा. लि. कडून रिमोट ई-व्होटिंग सुविधा बंद केली जाईल आणि एकदा मतदान केल्यावर ते बदलता येणार नाही,
(ब) सभेपूर्वी रिमोट ई-व्होटिंगद्वारे मतदान केलेल्या सदस्यांना सभेला उपस्थित राहता येईल, परंतु पुन्हा मतदान करता येणार नाही,
(क) ज्यांनी पूर्वी मतदान केलेले नाही, अशा सदस्यांसाठी सभेच्या वेळी ई-व्होटिंगची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल,
(ड) ज्याचे नाव सदस्यांच्या नोंदवहीत किंवा डिपॉझिटरीजने राखलेल्या नोंदवहीत कट-ऑफ दिनांकास नोंदलेले आहे, त्यालाच रिमोट ई-व्होटिंग व सभेत ई-व्होटिंगची सुविधा मिळेल.
७. ३८ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची अधिसूचना कंपनीच्या संकेतस्थळावर **www.spentasocks.com,** शेअर बाजाराच्या संकेतस्थळावर **www.bseindia.com** तसेच एमयूएफजी इनटाईम इंडिया प्रा. लि. च्या संकेतस्थळावर https://instavote.linkintime.co.in येथे उपलब्ध आहे.
८. लॉग-इन/ई-व्होटिंगबाबत काही शंका असल्यास, सदस्यांनी **instameet@in.mpms.mufg.com** या ई-मेलवर संपर्क साधावा किंवा दूरध्वनी क्र. ०२२-४९१८६०००/४९१८६१७५ वर संपर्क साधावा.

४. कंपनीच्या संचालक मंडळाने, ई-व्होटिंग प्रक्रियेची काटेकोर व पारदर्शक तपासणी करण्यासाठी मेसर्स एचएसपीएन अँड असोसिएट्स एलएलपी, प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरीज यांची तपासनीस म्हणून नेमणूक केली आहे.

५. कंपनीच्या इक्विटी शेअर्ससंबंधी सदस्य नोंदणी वही व शेअर हस्तांतरण वही शुक्रवार, दि. १२ सप्टेंबर, २०२५ पासून गुरुवार, दि. १८ सप्टेंबर, २०२५ पर्यंत (दोन्ही दिवस समाविष्ट) बंद राहील.

संचालक मंडळाच्या आदेशाने,

स्पेंटा इंटरनॅशनल लिमिटेड
सही/-
प्रिती शुक्ला
कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी

दिनांक: २९ ऑगस्ट, २०२५
ठिकाण: पालघर

JSW Infrastructure

जेएसडब्ल्यू इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड

सीआयएन : L45200MH2006PLC161268
नोंदणीकृत कार्यालय : जेएसडब्ल्यू सेंटर, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे पूर्व, मुंबई ४०० ०५१
संकेतस्थळ : www.jsw.in **ई-मेल :** infra.secretarialjsw.in
दूरध्वनी : +९१-२२-४२८६ १००० **फॅक्स :** +९१-२२-४२८६ ३०००

टपाली मतदान सूचना आणि ई-मतदान माहिती

याद्वारे जेएसडब्ल्यू इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (''कंपनी'') यांच्या सभासदांना सूचित करण्यात येते की कंपनी कायदा २०१३ (''कायदा'') कलम १०८ आणि कलम ११० च्या तरतुदींच्या अनुसार तसेच त्यासह वाचा कंपनीज (मॅनेजमेंट अँड ॲडमिनिस्ट्रेशन) नियम २०१४ चा नियम २० आणि नियम २२ च्या नुसार तसेच कायदा आणि नियम यांच्या लागू असलेल्या तरतुदींच्या अनुसार आणि सामान्य परिपत्रक क्रमांक १४/२०२० दिनांकीत ०८ एप्रिल २०२०, सामान्य परिपत्रक क्रमांक १७/ २०२० दिनांकीत १३ एप्रिल २०२०, आणि लागू असलेली अन्य परिपत्रके ज्यात सामान्य परिपत्रक ०९/२०२४ दिनांक १९ सप्टेंबर २०२४ चा समावेश आहे आणि जी कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय यांनी वेळोवेळी जारी केली आहेत (यापुढे ज्यांचा एकत्रित उल्लेख ''एमसीए परिपत्रके'' असा करण्यात येणार आहे) यांच्या अनुसार सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वयरमेंट्स) नियम २०१५ चा नियम ४४ (''लिस्टिंग रेग्युलेशन्स'') यांच्या अनुसार आणि वार्षिक सर्वसाधारण सभांच्या संदर्भात इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया यांनी जारी केलेले सेक्रेटेरिअल स्टॅंडर्ड्स (''एसएस-२'') आणि त्यात वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणा यांच्या अनुसार ही सूचना खालील विषयांना सभासदांची मान्यता टपाली मतदानाने इलेक्ट्रॉनिक मतदान पद्धतीच्या माध्यमातून (''ई-मतदान'') घेण्यासाठी पाठविण्यात आली आहे.

अ. क्र.	तपशील	प्रस्तावाचा प्रकार
१.	श्रीमती नीता मुखर्जी (डीआयएन ०००५६०१०) यांना कंपनीच्या अकार्यकारी संचालक, स्वतंत्र संचालक म्हणून नियुक्त करणे	विशेष
२.	श्री. ललित सिंघवी (डीआयएन : ०५३३५९३८) कंपनीचे अकार्यकारी आणि स्वतंत्र संचालक यांचा हुद्दा आणि मानधन यांच्यात बदल करणे	विशेष
३.	श्री. देवकी नंदन शर्मा (डीआयएन : ०६६२९३४३१) यांना कंपनीचे संचालक म्हणून नियुक्त करणे	सामान्य
४.	श्री. देवकी नंदन शर्मा (डीआयएन : ०६६२९३४३१) यांना कंपनीचे पूर्ण वेळ संचालक म्हणून नियुक्त करणे	विशेष

टपाली मतदान सूचना दिनांकीत २३ ऑगस्ट २०२५ (''सूचना'') तसेच त्यासह एक्स्प्लेनेटरी स्टेटमेंट सभासदांना इलेक्ट्रॉनिक माध्यमातून निर्गमित करण्याची प्रक्रिया कंपनीने गुरुवार, दिनांक २८ ऑगस्ट २०२५ रोजी पूर्ण केली आहे आणि ही सूचना अशा सभासदांना निर्गमित करण्यात आली आहे ज्या सभासदांचे ई-मेल तपशील डिपॉझिटरी/डिपॉझिटरी पार्टीसिपंट्स यांच्याकडे शुक्रवार दिनांक २२ ऑगस्ट २०२५ (''कट ऑफ तारीख'') रोजी नोंदणीकृत आहेत.

सर्वसाधारण सभा घेण्याच्या बाबतीत तसेच टपाली मतदान प्रक्रिया दूरस्थ ई-मतदान पद्धतीने घेण्याच्या संदर्भात एमसीए यांनी जारी केलेल्या परिपत्रकाच्या अनुसार टपाली मतदान सूचनेची प्रत्यक्ष प्रत तसेच त्यासह टपाली मतदान अर्ज आणि प्रीपेड बिझनेस रिप्लाय इन्व्हलप सभासदांना पाठविण्यात येणार नाहीत. सभासदांची सहमती किंवा असहमती केवळ इ मतदान पद्धतीने घेण्यात येणार आहे.

सभासदांचे मताधिकार हे (ई-मतदान पद्धतीने) शुक्रवार, दिनांक २२ ऑगस्ट २०२५ जी कट ऑफ तारीख आहे त्या दिवशी सभासदांकडे उपलब्ध असलेल्या इक्विटी समभागांवर अवलंबून असतील. कट ऑफ तारीख रोजी जी व्यक्ती कंपनीची सभासद नाही त्यांनी ही सूचना केवळ माहितीसाठी आहे असे समजावे.

कंपनी कायदा २०१३ चे कलम १०८ आणि ११० च्या तरतुदी तसेच लागू असलेल्या अन्य तरतुदी यांच्या अनुसार तसेच कंपनीज (मॅनेजमेंट अँड ॲडमिनिस्ट्रेशन) नियम २०१४ आणि त्यात वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणा यांच्या अनुसार सभासदांना सूचनेत नमूद करण्यात आलेल्या सर्व त्या विषयांवर ई-मतदान पद्धतीने मतदान करण्यासाठी रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्स्फर एजंट्स, केफिन टेक्नॉलॉजी लिमिटेड (ई- केफिनटेक') यांची उपलब्ध करून दिलेली ई-मतदान सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे.

ई-मतदान पोर्टल मतदानासाठी **शनिवार, दिनांक ३० ऑगस्ट २०२५ रोजी (भारतीय प्रमाण वेळेच्या अनुसार सकाळी ९.०० वाजता)** खुले करण्यात येईल आणि ते **रविवार, दिनांक २८ सप्टेंबर २०२५ रोजी (संध्याकाळी ५.०० भारतीय प्रमाण वेळेच्या अनुसार) पर्यंत** (दोन्ही दिवस धरून) खुले असेल. या कालावधीच्या दरम्यान कंपनीचे सभासद, ज्यांच्याकडे शुक्रवार दिनांक २२ ऑगस्ट२०२५ रोजी कंपनीचे समभाग आहेत असे सभासद इलेक्ट्रॉनिकली मतदान करू शकतील. इ मतदान प्रारूप त्यानंतर केफिन यांच्याकडून मतदानासाठी बंद करण्यात येईल.

टपाली मतदान सूचना कंपनीचे संकेतस्थळ म्हणजेच https:www.jsw.in येथे तसेच स्टॉक एक्स्चेंज यांचे संकेतस्थळ म्हणजेच बीएसई लिमिटेड www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड यांचे संकेतस्थळ www.nseindia.com आणि के फिन यांचे संकेतस्थळ https://evoting.kfintech.com येथे उपलब्ध करून देण्यात येत आहे आणि ती येथून डाउनलोड करता येईल.

टपाली मतदान/ई-मतदान योग्य आणि पारदर्शक पद्धतीने व्हावे याची छाननी करण्यासाठी छाननी अधिकारी म्हणून कंपनीच्या संचालक मंडळाने श्री. सुनील अगरवाल, प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी, (सभासद क्रमांक एफसीएस ८७०६ सीओपी क्रमांक : ३२८६) यांची नियुक्ती केली आहे.

ज्या सभासदांचे ई-मेल तपशील कंपनी आणि आरटीए यांच्याकडे नोंदणीकृत करण्यात आलेले नाहीत त्यांना आवाहन करण्यात येते की त्यांनी आपल्या डीपी यांच्याकडे ई-मेल तपशील नोंदणी करून घ्यावी. ज्या सभासदांकडे कंपनीचे समभाग डिमॅट स्वरूपात आहेत त्यांनी आपला ई-मेल तपशील आणि अन्य माहिती अद्ययावत करण्यासाठी आपल्या डिपॉझिटरी पार्टीसिपंटशी संपर्क साधावा.

ई-मतदान निकाल त्यांच्यासह आणि छाननी अधिकारी यांच्या अहवालासह कंपनीचे संकेतस्थळ www.jsw.in येथे प्रकाशित करण्यात येतील आणि त्यांची माहिती स्टॉक एक्स्चेंज यांचे संकेतस्थळ म्हणजेच बीएसई लिमिटेड यांचे संकेतस्थळ www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड यांचे संकेतस्थळ www.nseindia.com येथे आणि केफिन यांचे संकेतस्थळ https://evoting.kfintech.com येथे ई-मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कार्यालयीन कामकाजाच्या दोन दिवसांत कळविण्यात येईल.

कोणत्याही स्वरूपाच्या शंका असल्यास सभासदांनी https://evoting.kfintech.com येथे हेल्प सेक्शन मध्ये देण्यात आलेल्या फ्रिक्वेंटली आस्क्ड क्वेश्चन्स तसेच ई-मतदान युजर मॅन्युअल यांचा संदर्भ घ्यावा किंवा ई-मेलच्या माध्यमातून einward.ris@kfintech.com येथे संपर्क साधावा किंवा श्री. रामदास जी, वरिष्ठ व्यवस्थापक, कॉर्पोरेट रजिस्ट्री, के फिन टेक्नॉलॉजी लिमिटेड, युनिट जे एसडब्ल्यू इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, सेलेनियम टॉवर बी, प्लॉट ३१ आणि ३२, गाचीबोवली, फिनान्शिअल डिस्ट्रिक्ट, नानाक्रमगुडा, हैदराबाद ५०० ०३२ येथे संपर्क साधावा किंवा केफिन यांच्याशी १८०० ३०९ ४००१ (टोलफ्री) येथे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत संपर्क साधावा.

टपाली मतदान सूचनेत नमूद करण्यात आलेल्या आणि सभासदांच्या संमतीसाठी ठेवण्यात आलेल्या प्रस्तावांच्या संदर्भात कोणत्याही शंका असतील तर इ मेलच्या माध्यमातून infra.secretarial@jsw.in येथे संपर्क साधावा.

जेएसडब्ल्यू इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड करिता
सही/-
हितेश कनानी
कंपनी सेक्रेटरी आणि कम्प्लायन्स अधिकारी
(सभासद क्रमांक : एफ ६१८८)

स्थळ : मुंबई
दिनांक : २९ ऑगस्ट २०२५

SBI | STATE BANK OF INDIA

एसएआरबी ठाणे : ११६९७, स्ट्रेस्ड असेट रिकव्हरी ब्रांच, १ला मजला, प्लॉट क्र. ए-११२, सर्कल रोड क्र. २२, वागळे इंडस्ट्रीयल इस्टेट, ठाणे (पश्चिम), ४०० ६०४. **ई-मेल -** sbi.11697@sbi.co.in

जोडपत्र - IV-ए स्थावर मिळकतींच्या विक्रीसाठी विक्री सूचना (नियम ८(६) चे परंतुक पहा)

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) च्या परंतुकासह वाचत सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीअल अ‍ॅसेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

सर्वसामान्य जनता आणि विशेषकरून कर्जदार आणि हमीदार यांना याद्वारे सूचना देण्यात येते की, स्टेट बँक ऑफ इंडिया, तारणी धनको यांच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी **प्रत्यक्ष कब्जात** घेतलेल्या तारणी धनकोंकडे गहाण/भारग्रस्त असलेली खाली वर्णन केलेली स्थावर मिळकत **मे. रामेश्वरम फॅब्रिक्स, प्रोप्रायटर श्री महेशकुमार गोपीकिशन हेडा** यांच्याकडून तारणी धनकोंना येणे थकबाकी असलेल्या २२.०२.२०२३ रोजीसप्रमाणे **रु. २,२९,४८,१८२/- (रु. दोन कोटी एकोणतीस लाख अठ्ठेचाळीस हजार एकशे ब्याऐंशी मात्र)** सह त्यावरील पुढील व्याज, आनुषंगिक खर्च आणि परिव्ययाच्या वसुलीसाठी ३०.०९.२०२५ **रोजीस ''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे'' तत्त्वावर विकली जाईल. राखीव किंमत रु. ६१,४९,०००/- (रुपये एकसष्ठ लाख एकोणपन्नास हजार मात्र) आणि इसारा अनामत रक्कम रु. ६,१४,९००/- (रुपये सहा लाख चौदा हजार मात्र) असेल.**

इच्छुक बोलीदारांनी त्यांची बोली सादर करण्याआधी लिलावात ठेवलेल्या मिळकतींवरील भार, त्यांचे मालकी हक्क आणि मिळकतीला बाधा आणणाऱ्या दावे/अधिकार/सोसायटी/ बिल्डर्सच्या थकबाकीबाबत त्यांची स्वतंत्र चौकशी करून घ्यावी. ई-लिलावाची जाहिरात म्हणजे बँकेकडून कोणतेही वचन किंवा कोणतेही सांगणे असल्याचा अर्थ काढू नये किंवा तसा समज करून घेऊ नये.

बोलीदारांनी लिलाव तारखेपूर्वी मे. पीएसबी अलायन्स प्रायव्हेट लिमिटेडने अवलंब केलेल्या पध्दतीनुसार आवश्यक केवायसी दस्तावेज आणि नोंदणी शुल्क प्रदान करून (**https://baanknet.com**) वर स्वतः:ची नोंदणी करून घ्यावी.

जाहीर ई-लिलावाची तारीख आणि वेळ आहे ३०.०९.२०२५ रोजी दु. ०१.०० ते दु. ०३.०० प्रत्येकी १० मिनिटांच्या अमर्याद विस्तारासहीत.

मिळकतीचा तपशील

श्री. महेशकुमार गोपीकिशन हेडा यांच्या नावावरील मिलन अपार्टमेंटच्या समोर, जैन मंदिराच्या जवळ, महावीर चौक, अंजुर फाटा, भिवंडी-ठाणे रोडलगत, गाव कामतघर, तालुका भिवंडी, जि. ठाणे येथे स्थित सर्व्हे क्र. १६१, हिस्सा क्र. २ पैकी, सर्व्हे क्र. १६१, हिस्सा क्र. ७ पैकी धारक गुलमोहर को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. अशा नावाच्या आर.सी.सी. इमारतीच्या पाचव्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ५०४, मोजमापित ११९४.०० चौ. फू. संलग्नित ११०.९७ चौ. मी., बिल्ट-अप क्षेत्र.

मिळकत आयडी	राखीव किंमत (रु. मध्ये)	इसारा अनामत रक्कम (रु.)	बोली वाढीची रक्कम (रु.)	निरीक्षणाची तारीख आणि वेळ
एसबीआयएन१००००२१८४४७३	रु. ६१,४९,०००/-	रु. ६,१४,९००/-	रु. ५०,०००/-	१६.०९.२०२५ स. ११.०० ते दु. १.००

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तीसाठी कृपया स्टेट बँक ऑफ इंडिया, तारणी धनकोंची वेबसाईट मध्ये दिलेली लिंक बघावी **www.sbi.co.in, https://bank.sbi, https://sbi.co.in/web/sbi-in-the-news/auction-notices/sarfaesi-and-others** आणि **https://baanknet.com किंवा श्री. चंद्रकुमार डी. कांबळे, सीएलओ मोबा. क्र. ७८७५५५१५६६ आणि अवधूत लेले, सीओ मोबा. क्र. ९९७०८९४९७२ वर संपर्क साधावा.**

सही/-
चंद्रकुमार डी. कांबळे
मुख्य व्यवस्थापक आणि प्राधिकृत अधिकारी
स्टेट बँक ऑफ इंडिया

दिनांक : २८.०८.२०२५
ठिकाण: ठाणे

INOX आयनोक्स एअर प्रोडक्टस् प्रायव्हेट लिमिटेड

नोंद. कार्यालय : ए-२, टीटीसी औद्योगिक क्षेत्र, ठाणे बेलापूर रोड लगत, पावणे, ठाणे, नवी मुंबई-४००७१०. **टेलि. क्र.:** ६८८६००००/५०५१००००.
सीआयएन : यु २४९९९ एमएच १९६३ पीटीसी ०१२६२५
ई-मेल : info@inoxap.com, **वेबसाईट :** www.inoxairproducts.com

सूचना

इन्व्हेस्टर एज्युकेशन अ‍ॅण्ड प्रोटेक्शन फंडकडे समभागाचे हस्तांतर

सूचना याद्वारे देण्यात येते की, कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १२४ आणि १२५ सहवाचता वेळोवेळी सुधारित इन्व्हेस्टर एज्युकेशन अ‍ॅण्ड प्रोटेक्शन फंड ऑथोरिटी (अकाउंटिंग, ऑडिटिंग, ट्रान्सफर अ‍ॅण्ड रिफंड) रूल्स, २०१६ (नियम) ला अनुसरून कंपनीला इन्व्हेस्टर एज्युकेशन अ‍ॅण्ड प्रोटेक्शन फंड (आयईपीएफ) कडे मागील सात क्रमवार वर्षे साठी अप्रदानित/दावा न केलेल्या लाभांशाच्या संदर्भात समभाग हस्तांतरण करणे आवश्यक आहे.

कंपनीने सर्व अशा भागधारकांना व्यैयक्तिक पत्र पाठवले आहे ज्यांचे समभाग आयईपीएफ कडे हस्तांतरण होणे शक्य आहे आणि तसेच www.inoxairproducts.com. येथे तिच्या वेबसाईटवर अशा भागधारकांचे तपशील अपलोड केला आहे.

भागधारकांना पुढे सूचना देण्यात येते की, त्यांनी उशीरात उशीरा २ डिसेंबर, २०२५ पर्यंत वित्तिय वर्ष २०१७-१८ च्या पुढीलसाठी अप्रदानित/दावा न केलेल्या अंतिम लाभांषाच्या दावा करावा. जर सदर तारखेपर्यंत भागधारकांकडून समभागाच्या संदर्भात कोणत्याही कायदेशीर दावा प्राप्त न झाल्यास कंपनी वरील नियमांमध्ये नमूद केल्याप्रमाणे रितसर प्रक्रियेच्या अनुपालनात कोणत्याही पुढील सूचनेशिवाय समभाग हस्तांतर करणे च्या कार्यवाही करेल.

सूचना घेण्यात यावी की, आयईपीएफ कडे हस्तांतरित झालेल्या दावारहित लाभांश समभागाच्या संदर्भात कंपनीच्या विरोधात कोणताही दावा असणार नाही. भागधारकांना आयईपीएफ नियम अंतर्गत विहित प्रक्रियेच्या अनुपालन करून आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतर झालेल्या दावारहित लाभांष आणि संबंधित समभाग दोन्हीच्या दावा करू शकता, जिच्या तपशील www.iepf.gov.in वर उपलब्ध आहे.

वरील बाबतीत कोणत्याही चौकशी/ स्पष्टीकरणासाठी भागधारक आयनॉक्स एअर प्रोडक्टस् प्रायव्हेट लिमिटेड, पत्ताः ७ वा मजला, सीजे हाऊस, डॉ. अ‍ॅनी बेझंट रोड, वरळी, मुंबई ४०००१८, टेलि. क्र.: ०२२-४०३२ ३९६०, फॅक्स : ०२२-४०३२ ३१९१, ई-मेल : vishalshah.madhukant@inoxap.com येथे कंपनीशी संपर्क साधावा.

आयनोक्स एअर प्रोडक्टस् प्रायव्हेट लिमिटेड साठी
सही/-
विशाल एम. शाह
जीएम-लिगल आणि कंपनी सचिव
सभासदत्व क्रमांक: एफ७४३८

ठिकाण : मुंबई
दिनांक : २८ ऑगस्ट, २०२५

IL&FS | Private Equity

आयएल अ‍ॅण्ड एफएस इन्व्हेस्टमेंट मॅनेजर्स लिमिटेड

सीआयएन : एल६५९९९एमएच १९८६पीएलसी१४७९८१
नोंद. कार्यालय : दी आयएल अ‍ॅण्ड एफएस फायनान्शियल सेंटर, प्लॉट क्र. सी-२२, जी ब्लॉक, वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पू.), मुंबई-४०००५१
फोन : +९१-२२-२६५३-३३३३,
ईमेल : investor.relations@ilfsindia.com, वेबसाईट : www.iimlindia.com

सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते की, कंपनीची ३९वी वार्षिक सर्वसाधारण सभा (''एजीएम'') हि निगम व्यवहार मंत्रालय आणि सिक्युरिटीज अ‍ॅण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया द्वारे जारी सर्क्युलर्स (एकत्रित ''सर्क्युलर्स'' असा उल्लेख) नुसार शुक्रवार, १९ सप्टेंबर,२०२५ रोजी स. ११.०० वा. व्हिडिओ कॉन्फरन्सिंग/अदर ऑडिओ व्हिज्युअल मिन्सद्वारे घेण्यात येणार आहे.

सदर सर्क्युलर्सच्या अनुपालनात, कंपनीने कंपनी/रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट/ डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे ईमेल पत्ते नोंदविलेल्या कंपनीच्या भागधारकांना फक्त इलेक्ट्रॉनिक माध्यमाने गुरुवार, २८ ऑगस्ट, २०२५ रोजी एजीएमच्या सूचना समाविष्टित कंपनीच्या वार्षिक अहवालासाठी लिंक पाठवली आहे.

एजीएमच्या सूचनेसह कंपनीचा वार्षिक अहवाल कंपनीची वेबसाईट https://iimlindia.com/annual-reports-2, स्टॉक एक्स्चेंज म्हणजेच बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडची वेबसाईट अनुक्रमे www.bseindia.com आणि www.nseindia.com आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (''एनएसडीएल'') ची वेबसाईट www.evoting.nsdl.com वरुन डाऊनलोड करता येईल.

कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १०८ सहवाचता कंपनीज (मॅनेजमेंट अ‍ॅण्ड अ‍ॅडमिनिस्ट्रेशन) रुल्स, २०१४ च्या नियम २० आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अ‍ॅण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१४ च्या रेग्युलेशन ४४ ला अनुसरुन सूचना पुढे देण्यात येते की, कंपनी आगामी एजीएममध्ये करावयाच्या कामकाजाच्या संदर्भात तिच्या भागधारकांना एनएसडीएल द्वारे पुरवलेली दूरस्थ ई-मतदान सुविधा पुरवित आहे.

दूरस्थ ई-मतदानाचे तपशील खालीलप्रमाणे:

(१) दूरस्थ ई-मतदान मंगळवार, १६ ऑगस्ट, २०२५ रोजी स. ९.०० वा. सुरू होईल आणि गुरुवार, १८ ऑगस्ट, २०२५ रोजी सायं. ५.०० वा. संपेल. दूरस्थ ई-मतदान मॉड्युल त्यानंतर मतदानासाठी निष्क्रिय करण्यात येईल.

(२) भागधारकांचे मतदानाचे हक्क हे शुक्रवार, १२ सप्टेंबर २०२५ (''कट-ऑफ तारीख'') रोजीस कंपनीच्या भरणा झालेल्या भाग भांडवलाच्या त्यांच्या हिश्श्याच्या प्रमाणाते राहतील. दूरस्थ ई-मतदानाची सुविधा एजीएम दरम्यान सुध्दा उपलब्ध करण्यात येईल आणि एजीएममध्ये हजर असलेले भागधारक, ज्यांनी दूरस्थ मतदान ई-मतदानाद्वारे आपले मतदान केलेले नाही त्यांना एजीएम दरम्यान त्यांचा हक्क वापरणे शक्य होईल. ज्या व्यक्तींची नावे कट-ऑफ तारखेरोजीस लाभकारी मालकांचे रजिस्टर/सभासद रजिस्टरमध्ये नोंदविलेली असतील तेच फक्त दूरस्थ एजीएम पूर्वी/दरम्यान ई-मतदानाची सुविधा घेण्यासाठी हक्कदार राहतील.

(३) कोणीही व्यक्ती ज्यांनी एजीएमची सूचना पाठवल्यानंतर कंपनीचे शेअर्स संपादित केले आहेत आणि कट-ऑफ तारीख म्हणजेच शुक्रवार, १२ सप्टेंबर, २०२५ रोजीस शेअर्स धारण केले आहेत ते evoting@nsdl.co.in येथे एनएसडीएल ला किंवा investor.relations@ilfsindia.com येथे कंपनीकडे विनंती पाठवून दूरस्थ ई-मतदानासाठी लॉगिन आयडी आणि पासवर्ड प्राप्त करु शकतात. जी व्यक्ती कटऑफ तारखेस भागधारक नाही त्यांनी एजीएमची सूचना फक्त माहितीसाठी समजणे आवश्यक आहे.

(४) ज्या भागधारकांनी एजीएमपूर्वी दूरस्थ ई-मतदानाद्वारे त्यांचे मतदान केलेले आहे त्यांना एजीएममध्ये भाग घेण्याचा अधिकार असेल परंतु अशा ठरावावर पुन्हा मतदान करण्यास हक्कदार नसेल ज्या करिता त्यांनी एजीएम पूर्वी दुरस्थ ई-मतदान मार्फत त्यांनी मतदान केलेले होते.

(५) ज्या भागधारकांना एजीएमपूर्वी किंवा दरम्यान मदतीची गरज आहे ते evoting@nsdl.co.in वर एनएसडीएलला संपर्क करु शकतात किंवा : ०२२-४८८६-७००० वर कॉल करू शकतात.

केवायसी आणि ई-मेल नोंदणी:

(१) प्रत्यक्ष माध्यमाने शेअर्स धारण केलेले आणि त्यांचे केवायसी तपशील अद्ययावत केलेले नाहीत ते भागधारक प्रयोज्यनुसार संबंधित प्रपत्र सादर करून त्यांचा ई-मेल आणि इतर केवायसी तपशील नोंदविण्याची विनंती करण्यात येत आहे. भागधारक investor.relations@ilfsindia.com आणि rnt.helpdesk@in.mpms.mufg.com कडे ईमेलद्वारे ईमेल आणि इतर केवायसी तपशिलाच्या नोंदणीशी संबंधित त्यांची चौकशी पाठवावी.

(२) डीमॅट माध्यमाने शेअर्स धारण केलेल आणि त्यांचे केवायसी तपशील अद्ययावत न केलेल्या भागधारकांना त्यांच्या डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स् मार्फत त्यांच्या डिपॉझिटरीकडे त्यांचा ई-मेल आणि इतर केवायसी तपशील नोंदविण्याची विनंती करण्यात येत आहे.

याद्वारे हि सुध्दा सूचना देण्यात येते की, ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षासाठी लाभांश प्रदान करण्याच्या सोयीसाठी कंपनी शुक्रवार, १२ सप्टेंबर, २०२५ ही अभिलेख तारीख/कट-ऑफ तारीख ठरवली आहे.

(१) प्रत्यक्ष स्वरुपात शेअर्स धारण केलेले भागधारक, ज्यांची नावे १२ सप्टेंबर २०२५ च्या कामकाजाची वेळ संपतेवेळी कंपनीच्या भागधारकांच्या रजिस्टरमध्ये नोंदणीकृत आहेत त्यांना; आणि

(२) इलेक्ट्रॉनिक स्वरूपात धारण शेअर्सच्या संदर्भात, १२ सप्टेंबर, २०२५ च्या कामकाजाची वेळ संपतेवेळी एनएसडीएल आणि सेन्ट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड द्वारे सादर केलेल्या तपशीलानुसार सर्व लाभकारी मालकांना.

आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अनुसरुन, कंपनीने दिलेला किंवा वितरित केलेला लाभांश भागधारकांच्या हाती करपात्र आहे. भागधारकांनी तपशीलांसाठी https://iimlindia.com/tax-on-dividend/ ला भेट द्यावी आणि संबंधित कागदपत्रे ०५ सप्टेंबर, २०२४ पर्यंत सादर करावीत.

आयएल अ‍ॅण्ड एफएस इन्व्हेस्टमेंट मॅनेजर्स लिमिटेड साठी
सही/-
हरिष अग्रवाल
कंपनी सचिव
एसीएस क्र. १२५४९

ठिकाण : मुंबई
तारीख : २८ ऑगस्ट, २०२५

pnb पंजाब नैशनल बैंक punjab national bank

(Govt. of India Undertaking)

अ‍ॅसेट रिकव्हरी मॅनेजमेंट शाखा:-, मुंबई शहर, ६वा मजला, यू.बी.आय. बिल्डिंग, सर पी. एम. रोड, फोर्ट, मुंबई- ४०० ००१, **ईमेल:** cs6041@pnb.co.in

कब्जा सूचना [जोडपत्र IV] (नियम ८(१) पहा) (सुधारित एसआय-१०)

एका कर्जदाराच्या बाबतीत स्थावर मिळकतीसाठी कब्जा सूचना (स्थावर मिळकतीसाठी)

तर ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकारांनी **पंजाब नॅशनल बँक** चे प्राधिकृत अधिकारी म्हणून दि सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्टक्शन ऑफ फायनान्शिअल अ‍ॅसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अ‍ॅक्ट, २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ३ सहवाचता कलम १३(१२) अन्वये प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून **२३.०४.२०२५** रोजी **मागणी सूचना** जारी केली आहे, ज्यामध्ये कर्जदार **श्रीमती स्वाती श्यामनाथ पारकर (कर्जदार)** यांना सूचनेमध्ये नमूद केलेली रक्कम **रु. ५१,५९,८४५.४१ /- (रूपये एकावण्ण लाख ऐकोणसाठ हजार आठशे पंच्चेचाळीस आणि ऐकेचाळीस पैस मात्र)** पुढील व्याज आणि त्यावरील शुल्कासह **२३.०४.२०२५** पासून परतफेड सूचना प्राप्त झाल्याच्या तारीख/सूचना मिळाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत चुकती करण्यास सांगितले होते.

कर्जदार यांनी सदरहू रक्कम चुकती करण्यामध्ये कसूर केलेली आहे म्हणून कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकर्त्यांनी त्यांना/तिला प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून सदरहू अधिनियमाचे कलम १३ च्या उपकलम (४) आणि सदर नियमांच्या नियम ८ अन्वये ह्या **२६ ऑगस्ट २०२५** रोजी याखाली वर्णन केलेल्या मिळकतीचा **कब्जा** घेतलेला आहे.

विशेषतः कर्जदार आणि सर्वसामान्य जनता यांना याद्वारे सावधान करण्यात येते की, त्यांनी सदरहू मिळकतीच्या देवघेवीचा व्यवहार करू नये आणि सदरहू मिळकतीवरील कोणताही देवघेवीचा व्यवहार हा **पंजाब नॅशनल बँके**कडून सूचनेमध्ये नमूद केलेली रक्कम **रु. ५१,५९,८४५.४१ /- (रूपये एकावण्ण लाख ऐकोणसाठ हजार आठशे पंच्चेचाळीस आणि ऐकेचाळीस पैस मात्र)** पुढील व्याज आणि त्यावरील शुल्कासह दिनांक **२३.०४.२०२५** पासून शुल्क आकारले जाईल, पूर्ण परतफेड होईपर्यंत आणि खर्चासह त्यावरिल व्याजाच्या भाराअधीन राहील.

तारण मत्तेच्या विमोचनासाठी उपलब्ध वेळेत सदर अ‍ॅक्टच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदी अन्वये कर्जदार/हमीदार/गहाणखतदार चे लक्ष वेधले जाते.

स्थावर मिळकतीचे वर्णन :

फ्लॅट क्र. जी/०२, तळमजला, ज्योती एक्झॉटिक सीएचएस लिमिटेड, प्लॉट क्र. १८-ए, सीटीएस क्र. १०९/८८, भवानीनगर, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०००५९. सीमाबद्ध :- **उत्तरेला:-** भवानी टॉवर, **दक्षिणेला:-** मोकळी जमीन, **पूर्वेला:-** आदर्श नगरपार्क **पश्चिमेला:-** झेनिथ सीएचएस

सही/-
प्राधिकृत अधिकारी,
पंजाब नॅशनल बँक

दिनांक : २६.०८.२०२५
ठिकाण : मरोळ, अंधेरी पूर्व

KEMP

केम्प अँड कंपनी लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : पाचवा माळा, डिजीपी हाऊस, ८८-सी, ओल्ड प्रभादेवी रोड, मुंबई - ४०० ०२५.
सीआयएन : एल२४२३९एमएच१९८२पीएलसी०००४७ **टेलि :** ०२२-६६५३९०००
फॅक्स : ०२२-६६५३९०८९ ई-मेल kemp-investor@kempnco.com
वेबसाइट:www.kempnco.com

सूचना

(कंपनीचे इक्विटी शेअर्स आयइपीएफ अथॉरिटी यांच्या डि-मॅट खात्यात हस्तांतरित करण्यासाठी सूचना)

भागधारकांना माहिती देण्यात येते की कंपनी कायदा २०१३ च्या कलम १२४ (६) सहवाच्यता सुधारित (नियम) गुंतवणुकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरण नियमावली २०१६ (लेखांकन, लेखापरीक्षण, हस्तांतरण व परतावा) च्या नियम ६ अन्वये कंपनीने संबंधित सर्व सदस्यांना ज्यांचे लाभांश सलग सात किंवा त्याहून जास्त वर्षासाठीच्या काळात दिलेला नसेल किंवा या लाभांशासाठी दावा केलेला नसेल अशा सदस्यांना दिलेल्या लाभांशाच्या रकमेवर नवीनतम दावा करण्याची संधी ३ नोव्हेंबर २०२५ पर्यंत कंपनी देत असून यासाठी कंपनीने दिनांक २८ ऑगस्ट २०२५ रोजी नवीन उपलब्ध पत्यावर व्यक्तिगत सूचना पत्र पाठवले आहे.

भागधारकांना विनंती करण्यात येते कि, वित्तीय वर्ष २०१७-१८ दरम्यान घोषित केलेले अंतिम लाभांश ज्याचा सात वर्षाच्या कालावधीत दावा केलेला नसेल किंवा लाभांश दिलेला नसेल असे शेअर्स ३ डिसेंबर २०२५ मध्ये आयईपीएफ मध्ये जमा करण्यात येतील. ज्या शेअर्सवर लाभांश दिलेला नाही किंवा सलग सात वर्षांसाठी दावा न केल्यामुळे नियमांत नमूद केलेल्या प्रक्रियेनुसार असे शेअर्स हस्तांतरित केले जातील.

आयईपीएफ कडे हस्तांतरित होणाऱ्या अशा शेअर्सची माहिती कंपनीच्या वेबसाइटवर उपलब्ध करून दिली आहे.

तथापि, जेथे कोर्ट/ ट्रिब्युनलचा विशिष्ट आदेश शेअर्सच्या हस्तांतरणास प्रतिबंधित करतो किंवा जिथे डिपॉझीटरी कायदा, १९९६ नुसार शेअर्स तारण म्हणुन ठेवले जाते अशा शेअर्सचे आयईपीएफ कडे हस्तांतरित केले जाणार नाही.

कंपनीच्या संबंधित भागधारकांना विनंती करण्यात येते की,आर्थिक वर्ष २०१७-१८ आणि पुढील साठीचा घोषित केलेला अंतिम लाभांशावर ३ नोव्हेंबर २०२५ पर्यंत दावा करावा, अन्यथा कंपनी नियमांची आवश्यकता लक्षात घेऊन आर्थिक वर्ष २०१७-१८ साठीचा लाभांश आणि संबंधित शेअर्सच्या सूचना न देता आयईपीएफ खात्यात हस्तांतरित केले जातील.

संबंधित भागधारक, ज्यांनी दस्तावेजांच्या रूपात भाग धारण केले आहेत आणि ज्यांचे भाग आयईपीएफ ऑथॉरिटीकडे हस्तांतरित होण्यास पात्र आहेत, त्यांनी नोंद घ्यावी कि डिमटेरियलाझेशनच्या हेतूने त्यांनी धारण केलेल्या मूळ भाग प्रमाणपत्राच्या बदल्यात कंपनी नवीन भाग प्रमाणपत्र निर्गमित करेल आणि नियमानुसार भाग आयईपीएफ ऑथॉरिटीकडे हस्तांतरित करेल आणि अशा निर्गमानंतर, त्यांच्या नावे नोंदलेली प्रमाणपत्र आपोआप रद्द ठरतील आणि ना-वाटाघाटी योग्य मानले जातील.

कृपया लक्षात घ्या कि, दावा न केलेल्या लाभांशाच्या रकमेच्या आणि आयईपीएफ कडे हस्तांतरित केलेल्या शेअर्स संदर्भात कंपनी विरोधात कोणत्याही दावा खोटा नसेल. भागधारकांनी आयईपीएफ कडे हस्तांतरित केलेल्या भागामधून उपर्जित होणारे लाभ यासह लाभांश या संबंधीची मागणी नियमावलीत दिलेल्या कार्य पद्धतीनुसार आयईपीएफअथॉरिटी कडे करावी.

जर भागधारकांना हा विषय व नियमावली या संबंधित काही शंका असतील तर त्यांनी कंपनीचे रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट्स एमयुएफजी लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड सी-१०१, २४९ पार्क, एल बी एस मार्ग, विक्रोळी (पश्चिम) मुंबई - ४०० ०८३, टेली + ९१ ०२२ ४९१८६००० फॅक्स + ९१ ०२२ ४९१८६०६० ई-मेल : iepf.shares@linkintime.co.in वेबसाइट : https://in.mpms.mufg.com येथे संपर्क साधावा.

केम्प अँड कंपनी लिमिटेड करिता
सही/-
करण गुढका
कंपनी सचिव

ठिकाण : मुंबई
दिनांक : २९ ऑगस्ट २०२५

SM सिमंडस मार्शल लिमिटेड

नो. कार्यालय: प्लॉट क्र. सी-४/१, फेज II, चाकण एमआयडीसी, भांबोली, खेड, पुणे महाराष्ट्र-४१०५०१.
ई-मेल: dhruv@simmondsmarshall.com, **वेबसाइट:** www.simmondsmarshall.com
दू. क्र.: ०२२ ६६३३ ७४२५/२६/२७; **फॅक्स क्र.:** ०२२ ६६३३ ७४३३/३४
सीआयएन : एल२९२९९पीएन१९६०पीएलसी०११६४५

भागधारकांना सूचना

याद्वारे **सूचना** देण्यात येत आहे की, सिमंड्स मार्शल लिमिटेड (कंपनी) च्या सदस्यांची ६५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) **मंगळवार, २३ सप्टेंबर, २०२५ रोजी स. ११.०० वा.** (भाप्रवे) व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे (''व्हीसी'')/ इतर ऑडिओ-व्हिज्युअल माध्यम (''ओएव्हीएम'') सुविधेद्वारे एजीएम बोलावण्याच्या सूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे कामकाज करण्यासाठी आयोजित केली जाईल.

हे कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय (एमसीए) ने जारी केलेल्या १९ सप्टेंबर, २०२४ दिनांकीत सर्वसामान्य परिपत्रक क्र. ०९/२०२४ आणि सिक्युरिटीज् अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) ने जारी केलेल्या ३ ऑक्टोबर, २०२४ दिनांक सेबी/एचओ/सीएफडी/सीएफडी-पीओडी-२/पी/सीआयआर/२०२४/ १३३ (यानंतर ''परिपत्रके'' म्हणून एकत्रिकरित्या संदर्भित) आणि सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ (''सेबी लिस्टिंग रेग्युलेशनस्स), आणि या संदर्भात जारी केलेली इतर लागू परिपत्रकेनुसार आहे.

वरील एमसीए आणि सेबीच्या परिपत्रकांचे पालन करून, कंपनी ६५ व्या एजीएमच्या सूचनेची इलेक्ट्रॉनिक प्रत कंपनीच्या वि.व. २४-२५ च्या एकात्मिक वार्षिक अहवालासह ज्या सदस्यांचे ई-मेल पत्ते कंपनी/निबंधक आणि शेअर हस्तांतर एजंटस् (आरटीए)/डिपॉझिटरी पार्टिसिपंटस् (डीपी) कडे नोंदणीकृत आहेत त्यांना पाठवेल आहे. वरील परिपत्रकांनुसार, वार्षिक अहवालाच्या भौतिक प्रती पाठवण्याची आवश्यकता राहिली नाही. वि. व. २४-२५ च्या वार्षिक अहवालाच्या भौतिक प्रती फक्त त्या सदस्यांना पाठवल्या जातील जे विशेषतः secretarial@simmondsmarshall.com वर त्यांची फोलिओ क्रमांक/डीपीआयडी आणि क्लायंट आयडी नमूद करून विनंती करतात. ६५ व्या एजीएमची सूचना आणि वि. व. २०२४-२०२५ चा वार्षिक अहवाल देखील कंपनीच्या वेबसाइटवर उपलब्ध असेल (www.simmondsmarshall.com) आणि बीएसई लिमिटेड (www.bseindia.com) वर उपलब्ध आहे.

एजीएमच्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्व ठरावांवर त्यांचे मत देण्यासाठी कंपनीला सीडीएसएलची ई-व्होटिंग सुविधा पुरवताना तसेच एजीएमची ई-वोटिंग सुविधा उपलब्ध करून देताना आनंद होत आहे. अशा रिमोट ई-मतदानासाठी तपशीलवार प्रक्रिया नोटीसमध्ये प्रदान केली जाईल.

सदस्य केवळ व्हीसी/ओएव्हीएम सुविधेद्वारे एजीएममध्ये उपस्थित राहू शकतात आणि सहभागी होऊ शकतात.

(अ) एजीएमपूर्वी रिमोट ई-व्होटिंग, (ब) एजीएमच्या दिवशी ई-व्होटिंग आणि (सी) व्हीसी/ओएव्हीएम द्वारे एजीएमला उपस्थित राहण्यासंबंधी तपशीलवार सूचना सभेला बोलावलेल्या सूचनेमध्ये प्रदान केल्या जातील. कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १०३ नुसार व्हीसी/ओएव्हीएम द्वारे सभेला उपस्थित राहणाऱ्या सदस्यांची गणना कोरमच्या उद्देशाने केली जाईल.

➢ **ज्या सभासदांनी त्यांचे ईमेल पत्ते कंपनी/आरटीएकडे नोंदणीकृत केलेले नाहीत ते प्रत्यक्ष स्वरूपात शेअर्स धारण केलेले सदस्य खाली नमूद केल्याप्रमाणे ईमेल पत्त्याची नोंदणी करण्याच्या प्रक्रियेचे अनुसरण करून त्यांचे ईमेल पत्ते नोंदणीकृत करू शकतात:**

अ) लिंक ला भेट द्या : https://web.in.mpms.mufg.com/EmailReg/Email_Register.html.
ब) ड्रॉपडाउन सूचीमधून कंपनीचे नाव निवडा : Simmonds Marshall Limited.
क) फोलिओ क्रमांक/डीपी आयडी, क्लायंट आयडी, शेअरहोल्डरचे नाव, पॅन तपशील, मोबाइल क्रमांक आणि ई-मेल पत्ता प्रविष्ट करा. प्रत्यक्ष स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या सदस्यांना त्यांच्या शेअर सर्टिफिकेट क्रमांकांपैकी एक प्रविष्ट करणे आणि पॅन कार्डची स्वयं-साक्षांकित प्रत आणि पत्ता पुरावा उदा. आधार कार्ड किंवा पासपोर्ट आणि त्यांच्या शेअर सर्टिफिकेटच्या पुढे आणि मागची बाजूची प्रत अपलोड.
ड) प्रणाली मोबाईल क्रमांकावर ओटीपी आणि ई-मेल पत्ता पाठवेल.
इ) मोबाईल क्रमांकावर प्राप्त झालेला ओटीपी आणि ई-मेल पत्ता प्रविष्ट करा.
फ) त्यानंतर सिस्टीम एकात्मिक वार्षिक अहवाल २०२४-२५ आणि ई-वोटिंग क्रेडेन्शियलसह एजीएमच्या नोटिसच्या मर्यादित उद्देशासाठी ई-मेल पत्त्याची पुष्टी करेल.

➢ **डीमॅट शेअरधारकांसाठी -** कृपया तुमच्या संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंट (डीपी) सोबत जे ई-मतदान करताना आणि डिपॉझिटरीद्वारे व्हर्च्युअल मीटिंगमध्ये सामील होताना अनिवार्य आहे.

सिमंड्स मार्शल लिमिटेड साठी
सही/-
एन.एस. मार्शल
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
(डीआयएन : ०००८५७५४)

ठिकाण : मुंबई
तारीख : २९ ऑगस्ट, २०२५